आकर्षक व दर्जेदार स्कीमसह
युसीएन सिटी डिजिटल सेट-टॉप बॉक्स आपल्या घरी..
UCN
Digital TV & Broadband Services

संपर्क :- 9129582958
पत्ता - शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स बुलडाणा अर्बन मुख्यालय समोर बुलडाणा

दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
City NEWS
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

KAYASTH
Caters & Event Management

Rajendra Deochand Kayasth-9657572742 | 7350565657
Karanja Chowk,Shiv Shopping Complex,Buldana-443001

संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ५०९ शनिवार दि ०७ नोव्हेंबर २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

२ भेटी, एक फोन अन् राष्ट्रवादीत चक्रे फिरली, विलिनीकरणाच्या चर्चे मागची इन्साइड स्टोरी...

वृत्तसंस्था-दिल्ली

अजितदादा गटाच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आज एक नवीन बॉम्ब फोडून खळबळ उडवून दिली आहे. दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या बैठका झाल्या होत्या. अजित पवार यांनी मला त्याची कल्पना दिली होती, असं सुनील तटकरे यांनी म्हटलं आहे. यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चा रंगल्या आहेत. गेल्या आठ दिवसात राष्ट्रवादीत घडलेल्या चार घटनांमुळे तटकरे यांनी विलिनीकरणाचं भूत उकरून टायमिंग साधल्याचं बोललं जात आहे. या चार घटना म्हणजे विधान परिषदेतील पराभव, दोन राजकीय भेटी आणि एका सर्वोच्च नेत्याचा फोन. या चार घटनांमुळे राष्ट्रवादीत मोठ्या घडामोडी घडत असल्याचं बोलल जात आहे. काय आहेत या घटना? राज्यात झालेल्या विधान परिषदेच्या निवडणुकीत अजितदादा गटाचा दणकून पराभव झाला आहे. तर शरद पवार गटाला या निवडणुकीत १०० टक्के यश मिळालं आहे. त्यामुळे शरद पवार यांच्या गटावर राज्यातील जनतेचा विश्वास असल्याचं अधोरेखित झालं आहे. तर अजितदादा गटात नेतृत्वाची पोकळी असल्याचं उघड झालं आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षाला नेटाने पुढे नेणारा आणि राजकीय स्ट्रॅटेजीत उजवा असलेला नेताच राष्ट्रवादीत उरला नसल्याचंही उघड झालं आहे. या निवडणुकीनंतर प्रफुल्ल पटेल यांनी ट्विट करून नेतृत्त्वावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. त्यामुळे पुढच्या निवडणुकीत सक्षम नेतृत्त्व असल्याशिवाय पक्षाला चांगले दिवस येणार नाहीत, नाही तर पक्ष विखरायला वेळ लागणार नाही, असं अजितदादा गटातील नेत्यांना वाटत असल्याचं सूत्रांनी सांगितलं. गेल्या आठवड्यात राष्ट्रवादीच्या बड्या नेत्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. यावेळी तुमच्याशी चर्चा केल्याशिवाय आम्ही विलिनीकरणाची चर्चा करणार नाही, अशी हमीच या नेत्यांनी अमित शाह यांना दिली होती. तसेच या नेत्यांनी पार्थ पवार यांच्या पक्षातील वाढत्या हस्तक्षेपावर अमित शाहांकडे तक्रारही केली होती, असं सूत्रांनी सांगितलं. विशेष म्हणजे सुनेत्रा पवार यांना अंधारात ठेवून प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे आणि समीर भुजबळ यांनी शाह यांची भेट घेतली होती. यावरून राष्ट्रवादीत सर्व काही अलबेल नसल्याचं स्पष्ट झालं होतं. त्यानंतर लगेचच तटकरे यांनी विलिनीकरणावर भाष्य केल्याने तटकरे यांच्या या विधानाला शाह यांच्या भेटीशी जोडून पाहिलं जात आहे. शरद पवार हे पुण्यतील रुबी रुग्णालयात उपचार घेत असताना त्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोन आला. मोदींनी पवारांच्या तब्येतीची विचारपूस केली. त्यांना काळजी घेण्याचा सल्लाही दिला. तसेच सुप्रियाताई आणि आम्ही देश सांभाळतो. तुम्ही काळजी करू नका. आम्हाला आशीर्वाद देण्यासाठी तुम्ही ठणठणीत बरे व्हा, असं मोदी पवारांना म्हणाले. मोदी यांच्या या विधानाचे अनेक अर्थ काढले जात आहे. सुप्रियाताई आणि आम्ही देश सांभाळतो असं मोदी थेट म्हणाले. त्यामुळे पवार एनडीएसोबत जाणार आहेत का? त्यापूर्वी राष्ट्रवादीचं विलिनीकरण होणार आहे का? अशी चर्चा आता रंगली आहे. पवार मुंबईत ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल झाले. त्यानंतर काल प्रफुल्ल पटेल यांनी पवारांची भेट घेतली. त्यांच्याशी तासभर चर्चा केली. १० तारखेला भेटू, असं पवारांनी पटेलांना सांगितलं. त्यामुळे राजकीय वर्तुळात पुन्हा चर्चा रंगल्या



आहेत. १० तारखेला नेमकं काय होणार आहे? पटेल हे दुसऱ्या पक्षात असताना आणि पवार स्वत: आजारी असताना त्यांनी पटेलांशी अशा कोणत्या विषयावर चर्चा केल्या? राष्ट्रवादीच्या विलिनीकरणावर तर चर्चा झाली नाही ना? विलिनीकरणाचा फॉर्म्युला तर ठरला नाही ना? अशी चर्चा सुरू असतानाच पटेल यांच्या भेटीनंतर सुनील तटकरे यांनी विलिनीकरणावर भाष्य करून मोठे राजकीय संकेत दिले आहेत. येत्या १० तारखेनंतरच हे राजकीय संकेत काय आहेत? कोणत्या घडामोडी घडणार आहे? हे स्पष्ट होणार असल्याचं राजकीय विश्लेषकांचं म्हणणं आहे.

मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाला गती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मोठी घोषणा..

वृत्तसंस्था-नागपूर

मराठवाड्यातील पाणीटंचाईचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवून या भागाला दुष्काळमुक्त करण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाला गती द्यावी. प्रकल्पाचा प्राथमिक प्रकल्प अहवाल तातडीने अपलोड करून केंद्र सरकारच्या आर्थिक व्यवहार विभागाकडे पाठविण्याची कार्यवाही वेगाने पूर्ण करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील वर्षा शासकीय निवासस्थानी जायकाच्या वरिष्ठ शिष्टमंडळासमवेत उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीत मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाच्या आराखड्यासह महाराष्ट्र आणि जपान यांच्या सहकार्याने सुरू असलेल्या विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी जपान इंटरनॅशनल कोऑपरेशन एजन्सी () कडून सुमारे २० हजार कोटी रुपयांचे अर्थसहाय्य उपलब्ध होणार आहे. मराठवाड्यातील पाण्याचे असमान वितरण लक्षात घेता अतिरिक्त पाणीसाठा असलेल्या धरणांमधून दुष्काळी भागातील धरणांपर्यंत बंदिस्त पाइपलाइनद्वारे पाणी पोहोचविणे हा वॉटर ग्रीड प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी दुहेरी प्रवाहाची व्यवस्था विकसित करण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर आण धाराशिव या चार जिल्ह्यांचा समावेश असून जायकवाडी, माजलगाव, मांजरा, उजनी, निम्न तेरणा आणि निम्न मनार ही धरणे परस्परांना जोडण्यात येणार आहेत. सुमारे ३ हजार ९५ किलोमीटर लांबीच्या मुख्य व दुय्यम पाइपलाइन आणि १५ जलशुद्धीकरण केंद्रांची उभारणी करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा सुमारे एक कोटी नागरिकांना थेट लाभ होणार आहे. संपूर्ण आठ जिल्ह्यांतील वॉटर ग्रीड प्रकल्पाची अंदाजित किंमत सुमारे २५ हजार ५६ कोटी रुपये आहे. पहिल्या टप्प्यासाठी सुमारे २० हजार कोटी रुपयांचे कर्जसहाय्य देण्याबाबत जायकाने सकारात्मक प्रतिसाद दर्शविला आहे. लातूर आणि धाराशिव हे भूकंपप्रवण क्षेत्रात येत असल्याने प्रकल्पाच्या बांधकामात जपानचे प्रगत भूकंपरोधक तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे. त्यामध्ये डक्टाईल आयर्न पाइप्स, आधुनिक पंपिंग यंत्रणा आणि प्रणालीचा समावेश असेल. तसेच छत्रपती संभाजीनगरमधील ऑरिक सिटी, शेंद्रा-बिडकीन आणि वाळूज औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांना शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध होण्यास या प्रकल्पामुळे मदत होणार आहे. ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स () क्षेत्रात महाराष्ट्राला जागतिक स्तरावर पुढे नेण्यासाठी जपानी कंपन्या आणि इंडियन इन्स्टिट्यूट



ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीज () यांच्या सहकार्याने उपक्रम राबविण्यात येत आहेत. याअंतर्गत फेब्रुवारीमध्ये मुंबईत ड्रमांगा कारवानफ आयोजित करण्यात येणार असून, या उपक्रमाचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वागत केले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

पश्तुन समुदायाचा संताप



पाकिस्तान वरवर एक राष्ट्र म्हणून दिसत असले, तरी प्रत्यक्षात तो आतून खोलवर विभागलेला देश आहे. त्याच्या राजकारणावर लष्कर आणि पंजाबी सत्ताकेंद्रांचे निर्विवाद वर्चस्व आहे. पंजाब, सिंध, खैबर-पख्तुनख्वा आणि बलुचिस्तान हे पाकिस्तानचे चार प्रमुख प्रांत. त्यापैकी बलुचिस्तानातील लोक मनाने कधीच पाकिस्तानशी पूर्णपणे एकरूप झाले नाहीत. तिथे पाकिस्तानचे अस्तित्व प्रामुख्याने लष्कर आणि आयएसआयच्या बळावर टिकले आहे. आता खैबर-पख्तुनख्वातही पाकिस्तान सरकार आणि लष्कराविरोधातील असंतोष उघडपणे दिसू लागला आहे. या असंतोषामागे वर्षानुवर्षे साचलेली उपेक्षा, विकासाचा अभाव आणि राज्यकर्त्यांविषयीचा अविश्वास आहे. अफगाणिस्तानला लागून असलेला खैबर-पख्तुनख्वा हा अत्यंत संवेदनशील प्रांत. अनेक दहशतवादी संघटना येथे सक्रिय आहेत. त्यात तेहरिक-ए-तालिबान पाकिस्तान (टीटीपी) सर्वाधिक सक्रिय आणि भयावह मानली जाते. टीटीपीला ङ्गपाकिस्तान तालिबानफ असेही म्हटले जाते. अफगाण तालिबान आणि टीटीपी यांच्यातील संबंध अफगाण सरकार नाकारत असले, तरी त्यांच्यातील जवळीक सर्वश्रुत आहे. काही दिवसांपूर्वीपर्यंत या प्रांतात माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या पाकिस्तान तेहरिक-ए-इन्साफ पक्षाचे सरकार होते. दहशतवादविरोधी लढ्यात खैबर-पख्तुनख्वा सरकार पुरेसे सहकार्य करत नाही, असा आरोप करून पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या सरकारने ११ ऑक्टोबर रोजी या प्रांतात आणीबाणी लागू केली आणि सरकार बरखास्त केले. इम्रान खान स्वतः पश्तुन आहेत. त्यामुळे या निर्णयाला केवळ सुरक्षा नव्हे, तर ठळक राजकीय संदर्भही आहे. आणीबाणी लागू होताच मुख्यमंत्री महंमद साहिल आफ्रिदी, माजी मुख्यमंत्री गंडापूर आणि इतर अनेकांना अटक झाली किंवा नजरकैदेत ठेवण्यात आले. या कारवाईमागील खरे कारण राजकीय असल्याचे अनेकांचे मत आहे. पाच ऑगस्ट २०२३ पासून इम्रान खान तुरुंगात आहेत. तरीही त्यांची लोकप्रियता कमी झालेली नाही; उलट पाकिस्तानात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्याबद्दल सहानुभूती वाढताना दिसते. त्यांच्या प्रकृतीबद्दलही चिंता व्यक्त केली जात आहे. काही माजी क्रिकेटपटूंनी, त्यात भारतातील काहींचाही समावेश आहे, इम्रान खान यांना तुरुंगात चांगली वागणूक आणि योग्य वैद्यकीय सेवा मिळावी, अशी मागणी केली आहे. खैबर-पख्तुनख्वातील लोकांमध्ये विकास न झाल्याची तीव्र भावना आहे. तेथील पश्तुन समाजासमोरचे प्रश्न अधिक गुंतागुंतीचे होत चालले आहेत. तरुणांचे अपहरण, बनावट चकमकी, आयएसआयकडून होणारा छळ, मानवाधिकारांचे उल्लंघन आणि टीटीपीची दहशत या साऱ्यांनी समाजात असुरक्षिततेची भावना वाढवली आहे. या वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांत टीटीपीच्या हल्ल्यांत पोलिसांसह १७०२ लोक मारले गेले. गेल्या वर्षी हा आकडा २३५९ होता. टीटीपीच्या मुद्द्यावरून पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्येही तणाव वाढत आहे. दोन्ही देश एकमेकांवर हवाई हल्ले करत आहेत. पाकिस्तान लढाऊ विमानांचा वापर करतो, तर अफगाणिस्तान ड्रोनचा वापर करतो. अफगाण सरकारने टीटीपीला मदत थांबवावी, अशी पाकिस्तानची मागणी आहे; तर टीटीपीशी आपला काही संबंध नसल्याचे अफगाणिस्तानचे म्हणणे आहे. काव्यगत न्याय असा, की ज्या पाकिस्तानने तालिबानला वाढवले, त्याच तालिबानचा प्रभाव आता पाकिस्तानसाठी आव्हान बनला आहे. १५ ऑगस्ट २०२१ रोजी तालिबानने काबुलवर ताबा मिळवला, तेव्हा इम्रान खान पाकिस्तानचे पंतप्रधान होते. त्या वेळी त्यांनी अफगाण जनता खऱ्या अर्थाने गुलामगिरीतून मुक्त झाली, असे वक्तव्य केले होते. नंतर तालिबानमधील अंतर्गत मतभेदांमुळे सरकार स्थापन होण्यात अडचणी येत असताना आयएसआयचे तत्कालीन प्रमुख फैझ हमीद काबूलला गेले आणि त्यांनी तालिबान नेत्यांशी चर्चा केली. या घटनांवरून पाकिस्तान आणि तालिबान यांचे संबंध किती गुंतागुंतीचे आहेत, हे स्पष्ट होते.



The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

मोदी सरकारने टाकला मोठा डाव! पटनायक ते उद्धव ठाकरे...; केंद्राची विरोधकांशी चर्चा, राजकीय समीकरणं बदलणार

■ मुंबई/वृत्तसंस्था

केंद्र सरकार या महिन्यात संविधान विधेयक, परिसीमन (दुरुस्ती) विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) विधेयक मंजूर करण्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावू शकते. ज्याद्वारे लोकसभेत महिला आरक्षणाची अंमलबजावणी होईल. सहा महिन्यांपूर्वी लोकसभेत दोन-तृतीयांश बहुमत मिळवण्यात अपयशी ठरल्याने सरकार आपल्या पहिल्या प्रयत्नात अयशस्वी ठरले होते. आता असे म्हटले जात आहे की, सरकारने आवश्यक संख्याबळ मिळवले आहे. विशेष अधिवेशन बोलावण्याच्या सुमारे आठवडाभर आधी ही सूचना जारी केली जाऊ शकते.संसदेचे पावसाळी अधिवेशन १३ ऑगस्ट रोजी संपले, परंतु ते



अद्याप स्थगित करण्यात आलेले नाही. काँग्रेस पक्षाच्या सर्वपक्षीय बैठकीच्या मागणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत केंद्र सरकारने म्हटले आहे की, मतदारसंघ पुनर्रचनेशी संबंधित महिला आरक्षण विधेयक मंजूर करण्यासाठी विरोधी पक्षांशी चर्चा करण्याचा सातत्याने प्रयत्न केला जात आहे. केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना लिहिलेल्या पत्रात ही माहिती दिली.रिजिजू यांच्या पत्रानंतर, सरकार लवकरच महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयके सादर करेल, अशी अटकळ जोर धरू लागली आहे. राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांना लिहिलेल्या पत्रात रिजिजू यांनी म्हटले आहे की, राष्ट्रीय महत्त्वाच्या सर्व मुद्द्यांवरील विचारविनिमय आणि चर्चेत सर्व राजकीय पक्षांच्या सहभागाला सरकार महत्त्व देते आणि या संदर्भात डीएमके, समाजवादी पक्ष (एसपी) आणि इतर अनेक पक्षांशी चर्चा झाली आहे. काँग्रेस विधायक भूमिका बजावेल आणि भविष्यातील महत्त्वाच्या कायद्यांमध्ये अडथळा आणणार नाही. पत्रानुसार, सरकारने डीएमके, एसपी, एआयएमआयएम, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शिवसेना (यूबीटी), बीजेडी आणि वायएसआर काँग्रेस पक्षासह सर्व प्रमुख विरोधी पक्षांशी या विषयावर चर्चा केली आहे. यापूर्वी, मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून संसदेत मतदारसंघ पुनर्रचनेवरील घटनादुरुस्ती विधेयक सादर करण्यापूर्वी सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची विनंती केली होती.

रिजिजू म्हणाले, तुम्ही निदर्शनास आणून दिले आहे की, १३ ऑगस्ट २०२६ रोजी दोन्ही सभागृहांचे अनिश्चित काळासाठी कामकाज तहकूब होऊन ६४ दिवस उलटले असले तरी संसदेचे कामकाज तहकूब करण्यात आलेले नाही. या पत्रातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा परिसीमन विधेयकाशी संबंधित आहे. रिजिजू म्हणाले, परिसीमन दुरुस्ती विधेयकावर विचार करण्यासाठी आणि ते मंजूर करण्यासाठी सरकारने सातत्याने विरोधी पक्षांचे समर्थन आणि सहकार्य मागितले आहे.

सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रवादीच्या आमदाराची भाजप प्रवेशाची चर्चा; आता स्वत: नेत्याकडूनच खुलासा

■ दिल्ली/वृत्तसंस्था

राज्यात पदवीधर-शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीमुळे राजकीय नेत्यांच्या गाठीभेटी वाढल्या आहेत. विरोधी पक्षाचे आमदार सत्ताधारी आमदाराच्या व्यासपीठावर जात असल्याचे दिसत आहे. त्यामुळे आमदारांच्या पक्षांतराची जोरदार चर्चा सुरू आहे. नांदेडच्या प्रताप पाटील चिखलीकर हे देखील भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली. त्यामुळे नांदेडमध्ये सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रवादीला धक्का बसणार असल्याचे बोलले जात आहे. परंतु आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी ही चर्चा फेटाळून लावली आहे.आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी माध्यमांशी संवाद साधला. आमदार प्रताप पाटील चिखलीकर म्हणाले, 'भाजपच्या नांदेड येथील कोर कमिटीच्या बैठकीत माझ्या भाजप प्रवेशावर चर्चा झाल्याचे वृत्त वर्तमानपत्रात आले. मी कुण्या पक्षात जाणार किंवा न जाणार हे माझ्या सहकार्याकडून समोर यायला पाहिजेत. पण दुर्दैवाने त्यांनी त्यांच्या कोअर कमिटीमध्ये चर्चा केल्याच्या बातम्या आल्या. माझ्या सहकार्याचा कोणताही गैरसमज होऊ नये. त्याच्यासाठी मी स्वतः समोर येऊन राष्ट्रवादीतच राहणार असल्याचा खुलासा करत आहे. मी त्या पक्षात काम केलेले आहे. त्यामुळे अनेकांना वाटतं की, मी भाजपमध्ये यावं, तर अनेकांना मी येऊ नये असंही वाटतं. येऊ नये आणि यावं अशा दोन मताच्या



लोकांनी या चर्चा केल्या आहेत'.चिखलीकर पुढे म्हणाले, 'अजित पवारांनी मला सख्ख्या भावासारखे प्रेम दिले. त्यांच्या पश्चात सुनेत्रा वहिनींनी माझ्यावर पूर्ण ताकद आणि विश्वास दाखवला आहे. त्यामुळे मी कायम वहिनींच्या नेतृत्वाखालीच काम करत राहीन'. अजितदादांच्या निधनानंतर अर्थखाते अद्याप भाजपकडेच आहे. यावर चिखलीकरण म्हणाले, 'अर्थखाते पूर्वी राष्ट्रवादीकडे होतं आणि ते राष्ट्रवादीलाच मिळाले पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावर योग्य तो निर्णय घेतील आणि सुनेत्रा वहिनींना अर्थखाते देतील असा मला विश्वास आहे'. टायगर श्रॉफ गोळीबार प्रकरणावर चिखलीकर म्हणाले, 'टायगर श्रॉफ याच्यावरील हल्ल्यात अल्पवयीन मुले सहभागी असल्याची माहिती आहे. मुंबईसारख्या शहरात गँगवॉर होणं, त्यामध्ये अल्पवयीन मुलांचा वापर होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. सरकार या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांचा निश्चितच छडा लावेल'.

राष्ट्रवादीच्या आमदारावर गंभीर आरोप, थेट ॲट्रॉसिटी दाखल करण्याची मागणी

मुंबई : राजकीय विश्वातून एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार सुनील शेळके यांच्यावर मारहाणीचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी ॲट्रॉसिटी दाखल करण्याची मागणी केली आहे. मावळचे आमदार सुनील शेळके यांच्यावर आरटीआय कार्यकर्ते सुनील गुजर यांना मारहाण केल्याचा आरोप करण्यात आल्याचे समोर आले आहे. या घटनेनंतर खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात शुक्रवारी ही कथित मारहाणीची घटना घडली आहे. मारहाण करून हातातील बॅग हिसकावली आणि महत्त्वाची कागदपत्रे गायब केल्याचा सुनील गुजर यांनी दावा केला आहे. मावळ तालुक्यातील आंबळे गावातील गौणखनिज उत्खनन आणि जमिनीच्या व्यवहारावरून वाद झाल्याचा आरोप आहे. बेकायदा उत्खननामुळे शासनाचा लाखो रुपयांचा रॉयल्टी महसूल बुडाल्याचा सुनील गुजर यांनी दावा केला आहे.उत्खनन प्रकरणातील कथित गैरप्रकार उघड करण्याचा प्रयत्न केल्यामुळे सुनील शेळकेंनी मारहाण केल्याचा आरोप सुनील गुजरांकडून करण्यात आला आहे. यानंतर घटनेवेळी उपस्थित असलेल्या करुणा सरोदे यांनाही जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप केला आहे. शेळके यांच्यावर ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची करुणा सरोदे यांनी मागणी केली आहे.

अधिवेशनापूर्वीच राष्ट्रवादीला अर्थखातं मिळणार? सुनेत्रा पवारांनी घेतली शाहांची भेट



■ मुंबई/वृत्तसंस्था

राज्याच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेसच्या अर्थखात्याचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीवेळी खासदार पार्थ पवारही उपस्थित होते. विशेष म्हणजे, प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांच्याशिवाय सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांनी अमित शाह यांची घेतलेली ही दुसरी भेट असल्याची माहिती आहे. त्यामुळे या भेटीत नेमकी कोणती चर्चा झाली, याकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे.दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राज्याचं अर्थखातं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहे. हे खातं सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपवण्यात यावं, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसकडून सातत्याने केली जात आहे. पक्षाचे नेते प्रफुल पटेल यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनीही यासाठी आग्रह धरला आहे. आता सुनेत्रा पवार यांनी थेट अमित शाह यांची भेट घेतल्याने अर्थखात्याबाबतच्या चर्चांना पुन्हा उधाण आलं आहे.दरम्यान, पुण्यात भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांची समन्वय बैठक झाली होती. या बैठकीतही अर्थखात्याच्या मुद्द्यावर चर्चा झाल्याची माहिती समोर आली. मात्र, महायुतीत कोणतीही नाराजी किंवा वाद नसल्याचं भाजप आमदार राहुल कुल यांनी स्पष्ट केलं होतं.दुसरीकडे, काल १८ ऑक्टोबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सुनेत्रा पवार यांना अर्थमंत्रीपद मिळणार नसल्याचा दावा केला आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर भाजपने अर्थखातं स्वतःकडे ठेवल्याची टीकाही त्यांनी केली आहे.त्यामुळे राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि अर्थखात्याच्या वाटपाचा मुद्दा अमित शाह यांच्यासोबतच्या बैठकीत चर्चेला आल्याचं सांगितलं जात आहे. सुनेत्रा पवार यांच्या दिल्ली दौऱ्यातील भेटीगाठींनंतर अर्थखात्याचा तिढा सुटणार का, याची उत्सुकता आहे.

गोकुळ निवडणुकीतील विजयानंतर सतेज पाटलांची पहिली प्रतिक्रिया, म्हणाले आता यापुढे..

■ पुणे/वृत्तसंस्था

गोकुळ ही कोल्हापूरची अस्मिता आहे. एकमुखी कारभारच गोकुळमध्ये पाहिजे, ही आमची आधीपासून भूमिका होती. त्यामुळे आम्हाला दुध उत्पादक शेतकऱ्यांनी पाठिंबा दिला, गोकुळचा कारभार हा कोल्हापूरमधूनच चालावा, या भावनेतून आम्हाला मतं मिळाली, आमचा विजय मुश्रीफांनी स्वीकारायला पाहिजे होता, 5 ते 7 जागा आणखी जिंकलो असतो, अशी प्रतिक्रिया सतेज पाटलांनी दिली आहे. निवडणुकीच्या निकालानंतर त्यांनी पत्रकार परिषदेत संवाद साधला.गोकुळच्या या निवडणुकीत कोल्हापुरातील दूध उत्पादकांनी जे बहुमत दिले, त्याबद्दल 550 शेतकऱ्यांसह ठरावधारकांचे आभार मानतो. सर्वसामान्यांनाही



गोकुळमध्ये एकमुखी कारभार असावा, असे वाटत होते. जनरलमधील 98 मते बाद झाली आहेत. त्यातील 20 मते आमच्या चिठ्ठी चिन्हावर मारली होती. नाहीतर आमचे आणखी 7 ते 8 उमेदवार निवडून आले असते. लोकांचा कौल आमच्याच पॅनलच्या बाजूने होता. ही मते बाद ठरली नसती, तर आमच्या 20 जागा निवडून आल्या असत्या. पराभव खेळाडूवृत्तीने स्वीकारायला हवा होता. दोन उमेदवारांनी पुन्हा मतमोजणीची मागणी केली. बाद मते कन्फर्म केली होती. ही मते रिजेक्टेड होती, असं सतेज पाटलांनी म्हटलं आहे,कायद्याला धरून फेरमतमोजणीची मागणी नव्हती, म्हणून अर्ज बाद केले. कोल्हापुरात सत्तेतले लोक हे करत होते, त्याला चपराक बसली. कालपर्यंत बोलणाऱ्यांना या जिल्ह्यातील दूध उत्पादकांनी निकालातून उत्तर दिले आहे.मुश्रीफ आणि चंद्रदीप नरके यांनी अर्ज द्यायला नको होता. विजय-पराभव खेळाडूवृत्तीने स्वीकारायला हवा होता. त्यांचे दोन शिलेदार अर्ज करत होते, त्यामुळे तीन तास वाया गेले. आमची आणखी 5 ते 7 माणसे निवडून आली असती, जर 98 मते वाया गेली नसती. नियमानुसार तारीख लागेल आणि चेअरमन निवडला जाईल. मी आता टीकेत जाणार नाही. मला जाहीरनामा लोकांपर्यंत पोहोचवायचा आहे. आमचे संचालक मंडळ न्याय देण्याची भूमिका बजावेल. महायुतीतील वाद त्यांच्यातला आहे, त्यांनाच माहिती. तुम्ही एकत्रच येणार होतात, तर वाद कशाला केला, हा माझा सवाल आहे. सत्तेत असलो की सगळेच आपले असते, असे काही लोक धरून चालले होते. अरुण डोंगरेंनी जे राजकारण केले, त्याचा फटका बसला असेल. आबाजी आमच्याकडे शेवटपर्यंत होते, पण ते तिकडे गेले. लोकांच्या भावना होत्या, त्या लोकांनी व्यक्त केल्या. ही निवडणूक साडेपाच लाख शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून लढवली. येत्या सहा महिन्यांत सर्व गोष्टींची अंमलबजावणी झालेली दिसेल, असंही त्यांनी म्हटलं आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळींचा प्रहरी!

नोकरीसाठी पोर्तुगालला गेली, तिथे जाताच विकून टाकलं, छळ आणि... नागपूरच्या महिलेसोबत धक्कादायक प्रकार

■ नवी मुंबई/वृत्तसंस्था

गलेलठ्ठ पगाराच्या आमिषामुळे नागपूरची एक महिला पोर्तुगालमध्ये नोकरीसाठी गेली. तिथे जाताच तिची विक्री करण्यात आली. या महिलेचा लैंगिक छळ करण्यात आला. मारहाण करण्यात आली. त्यानंतर तिच्या नवऱ्यालाही धमकावण्यात आलं. अचानक घडलेल्या प्रकारामुळे ही महिला आणि तिचे कुटुंबीय हादरून गेले आहेत. पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत या प्रकरणी आंतरराष्ट्रीय मानवी तस्करीचा गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सुरू आहे. नागपूरमधील ही 28 वर्षीय महिला आहे. तिला दीड लाख रुपये पगार देण्याचं अमिष दाखवण्यात आलं होतं. पुण्याच्या एका कन्सल्टंट एजन्सीने हे अमिष दाखवलं होतं. सुपरमार्केटमध्ये नोकरी देण्याऐवजी पोर्तुगालमधील बिअर शॉप मालकाला महिलेला विकल्याचा धक्कादायक आरोप आहे. त्यामुळे ही महिला पोर्तुगालला गेली. पण तिथे तिला बियर



शॉपच्या मालकाला विकण्यात आलं. तिच्याकडून तिथे जबरदस्तीने काम करून घेण्यात आलं. तिचं शारीरिक आणि मानसिक शोषणही करण्यात आलं. मालकाच्या घरी ठेवून तिचं लैंगिक शोषण केल्याची तक्रार आहे. 'तुला खरेदी करण्यासाठी भारतातील एजंटना पैसे दिले आहेत', असं बिअर शॉप मालकाने सांगितल्याचा महिलेचा दावा आहे. ही महिला इन्स्टाग्रामच्या माध्यमातून पुण्यातील एका कन्सल्टन्सीच्या संपर्कात आली होती. तिला कंपनीच्या लोकांनी पोर्तुगालमध्ये कॅशियरची नोकरी देण्याचं आमिष दाखवलं. महिन्याला दीड लाख रुपये पगार मिळेल आणि आठ तासाची नोकरी राहील असंही सांगितलं. त्यामुळे ही महिला आणि तिच्या घरातील लोक खूश झाले. आता घरातील आर्थिक चणचण संपेल असं त्यांना वाटू लागलं. एवढं मोठं पॅकेज मिळतंय म्हटल्यावर सदर महिला ही कंपनीच्या जाळ्यात आली. व्हिसा आणि इतर कागदपत्र तयार करण्याच्या नावाखाली या महिलेकडून टप्पा टप्प्याने 11 लाख रुपये वसूल करण्यात आले.पण ही महिला पोर्तुगालला गेल्यावर कहाणी संपूर्णपणे बदलून गेली. महिला पोर्तुगालला जाताच एजंटांनी तिचा पासपोर्ट हिरावून घेतला. त्यानंतर तिला दोन दिवस एका खोलीत बंद करून ठेवलं. त्यानंतर या महिलेला बियर शॉपच्या मालकाला विकलं. तिथे तिच्याकडून जबरदस्तीने काम करून घेण्यात आलं. या महिलेने त्याला विरोध केल्यावर तिला मारहाण करण्यात आली. तिचं शारीरिक आणि मानसिक शोषण करण्यात आलं.महिलेने त्यांना पासपोर्ट मागितल्यावर आरोपींनी तिच्याकडे पैशाची मागणी केली. एक महिनाभर हा अत्याचार सहन केल्यानंतर या महिलेला तिथून निसटण्याची संधी मिळाली. तिथून निसटताच आधी ती पोर्तुगालहून बसने लिस्बनला गेली. नंतर मँड्रिडला आली. त्यानंतर ती दोहा मार्गे कशी तरी भारतात पोहोचली.भारतात पळून आल्यावरही तिची ससेहोलपट संपली नाही. कन्सल्टन्सीशी संबंधित लोकांनी तिला पुन्हा तीन लाख रुपये मागितले. तिला परत माल्टामध्ये नोकरी देण्याचं अमिष दाखवलं. तिने पैसे देण्यास नकार दिल्यावर तिच्या नवऱ्याला जीवे मारण्याची धमकी दिली. महिलेला खोट्या केसेसमध्ये अडकवण्याची धमकी दिली. त्यानंतर या महिलेने वैतागून पोलिसांमध्ये तक्रार केली. त्यानंतर पोलिसांनी या कन्सल्टन्सीच्या संचालकासहीत 8 जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या आरोपींवर मानवी तस्करी, फसवणूक आणि जबरदस्तीने पैसे वसूल करण्याचे आरोप करण्यात आले आहेत. पोलीस सध्या आरोपींचा शोध घेत आहेत.

'लुटेरी दुल्हन'चा गेम ओव्हर, भर मंडपातच हातात पडल्या बेड्या, नागपूरमध्ये घडलं काय ?

पुणे : नागपूरमध्ये लग्नाचे आमिष दाखवून पैसे उकळणाऱ्या 'लुटेरी दुल्हन'ला सीताबर्डी पोलिसांनी अटक केली आहे. गुजरातमधील एका तरुणाला नागपुरात बोलावून त्याच्याकडून ७० हजार रुपये रोख आणि सोन्या-चांदीचे दागिने उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. मुख्य सूत्रधार राणी उर्फ कोमल पांडे हिला अटक करण्यात आली असून न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. इतर आरोपींचा शोध सुरू आहे. फिर्यादी आकाश जिंदल पारेख हा विवाहासाठी वधूच्या शोधात असताना त्याचा राणी पांडे हिच्याशी संपर्क झाला. तिने स्वतःला नम्रता मालवीयची बहीण सांगून तिचे फोटो दाखवले.त्यानंतर आकाशला कोराडी येथील एका घरात नेऊन नम्रताशी भेट घडवण्यात आली. लग्नखर्चाच्या नावाखाली ७० हजार रुपये आणि दागिने घेतले. सीताबर्डीतील मंदिरात लग्नाची तयारी सुरू असताना एका व्यक्तीने नम्रता ही स्वतःची पत्नी असल्याचा दावा करत गोंधळ घातला. त्यानंतर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच आकाशने पोलिसांत तक्रार दिली. राणी पांडेचा यापूर्वीही अशाच फसवणुकीच्या गुन्ह्यात सहभाग असल्याचे समोर आले असून पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक संजय मेंढे यांनी दिली.ठरल्यानुसार सीताबर्डी येथील एका मंदिरात लग्नाची तयारी करण्यात आली होती. नवरदेव आणि नवरी मंडपात पोहचले. आकाश पारेख हा आनंदित होता. त्याला फसवणूक होत असल्याची साधी कल्पनाही आली नव्हती. लग्नविधी सुरू असतानाच अचानक एक अनोळखी व्यक्ती मंडपात दाखल झाली. त्याने नम्रता ही स्वतःची पत्नी आहे असा गोंधळ घातला. आकाशने या व्यक्तीला सर्व माहिती विचारली. तेव्हा आकाशच्या पायाखालची जमीनच सरकली. लग्नाच्या मंडपातच आपली मोठी फसवणूक झाल्याचे त्याच्या लक्षात आले. त्यानं तातडीने सीताबर्डी पोलीस ठाणे गाठले आणि घडलेला प्रकार कथन केला. त्याने तक्रार नोंदवली. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी मुख्य सूत्रधार राणी पांडे हिला ताब्यात घेतले. आता याप्रकरणातील मध्यस्थी आणि राणीच्या साथीदारांची धरपकड करण्यात येणार आहे.

नाशिकमध्ये इंजिनीअरच्या मृत्यूने खळबळ

नाशिक : नाशिकमधील 28 वर्षीय इंजिनीअरच्या मृत्यूने खळबळ उडाली आहे. इंजिनीअरने मानसिक त्रास आणि धमक्यांना कंटाळून आयुष्य संपवल्याची माहिती मिळत आहे. या प्रकरणी चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नाशिकला नोकरी करणाऱ्या तरुणाने गर्लफ्रेंडचा दुरावा आणि मारहाणीच्या त्रासातून आयुष्य संपवल्याचे समोर आलं आहे.जळगावच्या अमळनेर तालुक्यातील रहिवासी शिक्षक राजेंद्र भगवंतराव देसले पाटील यांचा मुलगा पवन राजेंद्र पाटील याने आत्महत्या केली. पवन पाटील हा नाशिकमधील एका खासगी कंपनीत नोकरीला होता.

गुन्ह्यातील संशयित तरुणी त्याची मैत्रीण असल्याचे सांगण्यात येत आहे. तिच्यापासून दुरावा झाल्याने पवन तणावात आला होता. पवन हा गावी जळगावला आला होता. त्यावेळी तो प्रचंड तणावात असल्याचे कुटुंबीयाच्या लक्षात आले. त्याची विचारपूस केली. त्यावेळी त्याने पोलीस पाटलाच्या मुलाने दोन ते तीन वेळा मारहाण केल्याचे सांगितले. पवनने संशयित तरुणीला खूप पैसे दिले होते. त्यानंतर तिने फोन-पेला ब्लॉक केले.

टायगर श्रॉफ गोळीबार प्रकरण ; जबाबदारी स्वीकारणारा अनिल पंडित नेमका कोण ?

पुणे : अभिनेता टायगर श्रॉफ याच्यावर जुहू परिसरात रविवार, १८ ऑक्टोबर रोजी झालेल्या गोळीबार प्रकरणात आतापर्यंत एकूण १० आरोपींना विविध राज्यातून अटक करण्यात आली आहे. आता या प्रकरणात गोळीबाराची जबाबदारी स्वीकारणारा आरोपी अनिल पंडित नेमका कोण आहे ? त्याचा या प्रकरणातील सहभाग शोधला जात असून आता पोलिसांनी त्याच्या विरोधात मोठे पाऊल उचलले आहे. या प्रकरणात कोटावरुन अटक करण्यात आलेल्या तिघा शुटरना कोर्टात हजर करुन पोलिसांनी नऊ दिवसांच्या कोठडीची मागणी पोलिसांनी केली आहे. या प्रकरणात पुढील तपास केला जात आहे.बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफ याच्यावर हल्ला केल्यानंतर या प्रकरणात सोशल मीडियावर जबाबदारी स्वीकारणारा आरोपी अनिल पंडित याच्याकडे पोलिसांनी आता मोर्चा वळवला आहे. अनिल पंडित हा लॉरेन्स बिश्नोई गैंगचा सदस्य आहे. अनिल पंडित हा ओव्हरसिज गुन्हेगारी कारवायांना तडीस नेत असतो. तो अमेरिकेतून ही टोळी चालवत असल्याचे म्हटले जात आहे.टायगरवरील या हल्ल्याची जबाबदारी सर्वप्रथम स्वीकारली होती. त्याने म्हटले होते की आज जे टायगर श्रॉफचे काम झाले. त्याची जबाबदारी आपण आणि हरमन संधू घेत आहोत. याला आम्ही कॉल करुन समजावले होते. पण याला समजले नाही. जो कोणी फिल्म इंडस्ट्रीज आमचे ऐकणार नाही. सलमान खान याच्यासोबत काम करेल त्याचा पुढचा नंबर असेल. वाट पाहा...अशा आशयाची पोस्ट अनिल पंडित याने केली होती.अलिकडे झालेल्या अशा प्रकारच्या हल्ल्याच्या घटनांची जबाबदारीचे दावे गेल्या सात महिन्यांत 'पंडित' नावाच्या व्यक्तीशी जोडले गेले आहेत. यामध्ये हरियाणातील पानिपत येथे एका मनी-एक्सचेंज कार्यालयात मार्च महिन्यात झालेला गोळीबार, दिल्लीत पंजाबी गायक गुरू रंधावा यांच्याशी संबंधित जिमबाहेर जून महिन्यात झालेला गोळीबार आणि सप्टेंबर महिन्यात हरियाणवी गायक दिलेर खर्किया यांच्या वाहनावर झालेला हल्ला यांचा समावेश आहे.लॉरेन्स बिश्नोई गैंगचा सदस्य असलेल्या अनिल पंडित याला टायगर श्रॉफ गोळीबार प्रकरणात वॉन्टेड आरोपी घोषित करण्यात आले आहे.

लॉरेन्स बिश्नोईची थेट चौकशी का करत नाही मुंबई पोलीस ? केंद्राचा तो आदेश...

■ नागपूर/वृत्तसंस्था

अभिनेता टायगर श्रॉफ याच्या कारवर रविवारी जुहूत झालेल्या गोळीबारानंतर लॉरेन्स बिश्नोई गैंग पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. या प्रकरणातील गैंगस्टर लॉरेन्स बिश्नोई साबरमतीच्या तरुंगात बंद आहे. मात्र, पोलिस पोलिसांनी त्याची मागे सलमान खान याच्या घरावरील गोळीबार आणि माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्ये प्रकरणात चौकशी करु शकली नाही असे म्हटले जात आहे. या चौकशीच्या आड केंद्राचा एक आदेश असल्याचे म्हटले जात आहे. हा आदेश नेमका काय आहे ?मुंबई पोलिस गैंगस्टर लॉरेन्स बिश्नोई याची चौकशी करु शकत नाही. गेल्या तीन वर्षात मुंबई शहरात घडलेल्या किमान चार मोठे गुन्ह्यात लॉरेन्स बिश्नोई या टोळीचे नाव पुढे आले आहे. ताजे प्रकरण अभिनेता टायगर श्रॉफ याच्या कारवरील गोळीबाराचे आहे, ज्यात दोन जण



जखमी झाले आहेत. या प्रकरणात शुटर सह एकूण दहा जणाना देशातील विविध ठिकाणांवरुन अटक करण्यात आली आहे. केंद्रिय गृह मंत्रालयाच्या एका आदेशामुळे गैंगस्टर लॉरेन्स बिश्नोई यांना साबरमती जेलमधून ट्रान्झिस्ट रिमांडवर मुंबईत आणि इतत्र नेता येत नाही.केंद्राने ऑगस्ट २०२३ मध्ये 'क्रिमिनल प्रोसिजर कोड' (CrPC) च्या कलम 268 अंतर्गत हा आदेश जारी केला आहे. त्यानुसार अन्य एजन्सीद्वारा चौकशी साठी लॉरेन्स बिश्नोई याला तुरुंगातून बाहेर नेण्यास बंदी आहे. आता सीआरपीसीच्या जागा घेणाऱ्या 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिता' (BNSS) च्या कलम ३०३ नुसार देखील हा आदेश लागू आहे. या आदेशामुळे कोर्टाने जारी केलेले प्रोडक्शन वॉरंट आणि तपास यंत्रणांची आरोपीला ताब्यात घेऊन चौकशी करण्याची इच्छा पूर्ण होत नाही.केंद्र सरकारचे म्हणणे आहे की हे पाऊल सार्वजनिक कायदा आणि सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी आणि एका जागेवरुन दुसऱ्या जागी नेताना हिंसेची जोखीम टाळण्यासाठी हा निर्णय घेतलेला आहे. जर एखाद्या तपास यंत्रणेला लॉरेन्स बिश्नोई याची चौकशी करायची असेल तर उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व्हिडीओ लिंकद्वारे किंवा तरुंग परिसरात आत जाऊनच चौकशी करता येईल असे म्हटले जात आहे.लॉरेन्स बिश्नोई हा पहिलाच कैदी नाही ज्याला अशी सुरक्षा देण्यात आली आहे. २०१५ मध्ये अंडरवर्ल्ड डॉन छोटा राजन याला देखील अशाच प्रकारची सुरक्षा देण्यात आली आहे. इंडोनेशियात अटक झाल्यानंतर आणि भारतात आणण्यानंतर छोटा राजन याला तिहार तरुंगात पाठवण्यात आले होते. तिहार तरुंगात मुलाखतीत राजनने दावा केला होता की मुंबईत त्याच्या जीवाला धोका होऊ शकतो. कारण मुंबई पोलिस दलातील काही अधिकारी त्याचा शत्रू दाऊद इब्राहिमसाठी काम करत आहेत.

लॉरेन्स बिश्नोई याचा छोटा भाऊ अनमोल देखील दिल्लीच्या तिहार तुरुंगात बंद आहे. गेल्यावर्षी अमेरिकेतून अनमोल बिश्नोई याला भारतात आणण्यात आले होते. त्यानंतर त्याला तिहार येथे ठेवण्यात आले आहे.साल २०२४ मध्ये त्याच्या टोळीच्या गुंडांनी अभिनेता सलमान खान याच्या वांद्रे येथील गैलेक्सी अपार्टमेंटच्या बाहेर गोळीबार केल्याच्या घटनेनंतर मुंबई पोलिसांनी लॉरेन्स बिश्नोई याच्या चौकशीची गरज लागली होती. साल २०२४ मध्ये दसऱ्याच्या दिवशीच वांद्रयात एनसीपीचे नेते बाबा सिद्दीकी यांची हत्या झाल्यानंतर लॉरेन्स बिश्नोई याचे नाव आले होते.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

स्मृती मानधना कॅप्टन होताच संघात पडली फूट?

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

भारतीय महिला क्रिकेट संघाने झिम्बाब्वेविरुद्ध एकदिवसीय मालिका ३-० अशी खिशात घालून विजय मिळवला. मैदानावर मुलींनी आपल्या खेळाची जादू दाखवत चाहत्यांची मनं जिंकली, पण मालिका विजयाच्या या जल्लोषात एका वेगळ्याच घटनेने सर्वांचे लक्ष वेधले गेले. टीम इंडियाच्या दोन दिग्गज खेळाडू कर्णधार स्मृती मानधना आणि अनुभवी फलंदाज हरमनप्रीत कौर यांच्यातील वाद चव्हाट्यावर आला अशी चर्चा सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर सुरू झाली आहे. ड्रेसिंग रूममध्ये दोघींमध्ये काही बिनसलंय का? अशी चर्चा आधीपासूनच रंगत होती. मॅचनंतर हरमनप्रीत आणि स्मृती या दोघींनीही एकमेकींना शेकहँण्ड केलं नाही.



मॅच संपल्यानंतर नेहमीप्रमाणे सर्व खेळाडू विजयाचा सेलिब्रेशन करत एकमेकींचे अभिनंदन करत होत्या. यादरम्यान, हरमनप्रीत कौर स्मृती मानधनाजवळ आली, पण काही कारणास्तव तिचे लक्ष दुसरीकडे वेधले गेले आणि स्मृतीनेही तिच्याकडे लक्ष दिलं नाही. सरळ सरळ इग्नोर झाल्याने दोघींमध्ये हँडशेक होऊ शकले नाही. हा व्हिडिओ अवघ्या काही सेकंदांचा होता, पण या व्हिडीओमुळे सोशल मीडियावर अनेक चर्चा रंगल्या आहेत. दोघींमध्ये ऑल इज वेल नाहीये का?" अशा शंका क्रिकेट चाहत्यांनी उपस्थित केल्या आहेत. मात्र, या केवळ अफवा आहेत की खरंच काही बिनसलं आहे याबाबत अद्याप दोघींकडून कोणतीही माहिती अधिकृतरित्या समोर आलेली नाही. याच मालिकेत, विशेषतः झिम्बाब्वेविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात हरमनप्रीत कौरने स्फोटक खेळी खेळली होती. तुफान फॉर्म दाखवत १२१ चेंडूंमध्ये धमाकेदार १२६ धावांची शतकी खेळी केली होती. भारतीय संघ अडचणीत असताना हरमनने केलेल्या कामगिरीचे कौतुक ड्रेसिंग रूममध्ये सर्वांनीच केली.

विशेष म्हणजे, हरमनचे ते शतक झाल्यावर स्मृती मानधनाने स्वतः जागेवरून उठून टाळ्या वाजवत तिचे कौतुक करताना दिसली. जर दोघींमध्ये काही बिनसलं असतं, तर मैदानावरील तो उत्साह आणि आनंद लपून तर राहिला नसता. व्हिडीओ सोशल मीडियावर खूप व्हायरल झाल्यामुळे या चर्चेला अधिक उधाण आले आहे.

२८ व्या वर्षी तडकाफडकी निवृत्ती घेतली

■ इंदूर/वृत्तसंस्था

आयर्लंड क्रिकेट संघाचा खेळाडू आणि यशस्वी लेग-स्पिनर बेन व्हाईटने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करून सर्वांना आश्चर्यचकित केले आहे. बेन व्हाईट फक्त २८ वर्षांचा असून तो आयर्लंड संघाचा एक महत्त्वाचा सदस्य होता. त्याचा शेवटचा सामना डिसेंबर २०२५ मध्ये बांगलादेशविरुद्ध झाला होता, जो आयर्लंडने जिंकला होता. बेन व्हाईटने २०२१ मध्ये आपल्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकिर्दीला सुरुवात केली आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध आपला पहिला सामना खेळला.बेन व्हाईटला आयर्लंडसाठी तिन्ही फॉरमॅटमध्ये खेळण्याची संधी मिळाली आहे आणि तो तीन टी-२० विश्वचषकांमध्ये संघाचा भाग होता. आपल्या निवृत्तीच्या निर्णयाबद्दलच्या निवेदनात बेन म्हणाला, "माझ्या देशाचे प्रतिनिधित्व करण्याची आणि सर्वोच्च स्तरावर क्रिकेट खेळण्याचे माझे बालपणीचे स्वप्न पूर्ण करण्याची संधी दिल्याबद्दल मी क्रिकेट आयर्लंडचे आभार मानू इच्छितो. तीन आयसीसी टी-२० विश्वचषकांमध्ये आयर्लंडचे प्रतिनिधित्व करणे आणि कसोटी क्रिकेट खेळणे, याची मी कधी कल्पनाही केली नव्हती." पण मला याचा नेहमीच खूप अभिमान वाटेल आणि या प्रवासात मिळालेल्या अनुभवांसाठी आणि आठवणींसाठी मी



कृतज्ञ राहीन. व्हाइटने २०२१, २०२४ आणि २०२६ या तीन टी२० विश्वचषकांमध्ये आयर्लंडचे प्रतिनिधित्व केले आहे.

बेन व्हाईटने जुलै २०२१ मध्ये आयर्लंडविरुद्ध पदार्पण केले. त्याने आयर्लंडसाठी ३८ टी२० आंतरराष्ट्रीय सामने खेळून ३६ बळी घेतले.लेग-स्पिनर बेन व्हाइटने आयर्लंडसाठी ४३ आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत, ज्यात ३ कसोटी, २ एकदिवसीय आणि ३८ टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांचा समावेश आहे. व्हाइटने कसोटीत चार आणि एकदिवसीय सामन्यांमध्ये फक्त एक बळी घेतला. त्याच्या टी२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत त्याने २७.३८ च्या सरासरीने ३६ बळी घेतले. आयर्लंड संघाच्या प्रशिक्षकानेही व्हाइटच्या निवृत्तीबाबत एक निवेदन जारी केले, ज्यात म्हटले आहे की, "मी त्याला त्याच्या भविष्यासाठी शुभेच्छा देतो. त्याने आपल्या देशासाठी ४० हून अधिक सामने खेळले याचा मला आनंद आहे आणि संघात त्याची उणीव नक्कीच भासेल."

किवीचं संकट काही कमी होईना, काय घडलं?

मुंबई :भारताविरुद्धच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेतील चौथ्या सामन्यापूर्वी न्यूझीलंडला मोठा धक्का बसला आहे. पहिले तीन सामने गमावल्यामुळे यजमान संघाने मालिका आधीच गमावली आहे. वेगवान गोलंदाज लॉकी फर्ग्युसन आता मालिकेतून बाहेर झाला आहे. टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेतील चौथा सामना शुक्रवारी ऑकलंडमधील ईडन पार्क येथे खेळला जाणार आहे. या सामन्याची सर्व तिकिटे विकली गेली आहेत.हॅगली ओव्हल येथे झालेल्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेतील दुसऱ्या सामन्यादरम्यान लॉकी फर्ग्युसनला त्याच्या उजव्या पोटरीमध्ये वेदना जाणवल्या. स्कॅनमध्ये स्नायूला ताण आल्याचे उघड झाले. मैदानावर परतण्यापूर्वी त्याला बरे होण्यासाठी अंदाजे आणखी एक आठवडा लागू शकतो. शेवटच्या दोन टी-२० सामन्यांसाठी संघात मॅट फिशरचा समावेश करण्यात आला आहे.भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील एकदिवसीय मालिका ४ नोव्हेंबरपासून सुरू होत आहे. न्यूझीलंड संघाला आशा आहे की लॉकी त्या मालिकेपूर्वी तंदुरुस्त होईल. दरम्यान, वेगवान गोलंदाज मॅट हेन्रीला दुसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यादरम्यान त्याच्या उजव्या मांडीत वेदना जाणवल्या आणि त्याची पुढील तपासणी करण्यात आली.

चार वर्षांहून अधिक काळ अधिराज्य गाजवणाऱ्या जडेजाला धक्का, काय घडलं?

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

भारतीय संघाचा स्टार अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजा हा मागील काही काळापासून सलग सामने खेळत नाहीये. आता याचा परिणाम जडेजाच्या रँकिंगवर झाला आहे. आयसीसी कसोटी अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत रवींद्र जडेजाचे वर्चस्व संपुष्टात आले आहे. बुधवार, २८ ऑक्टोबर रोजी जाहीर झालेल्या क्रमवारीत, जडेजा एका स्थानाने घसरून दुसऱ्या स्थानावर आला आहे. हा भारतीय क्रिकेटपटू गेल्या चार वर्षांपासून या यादीत अव्वल स्थानी होता. यामुळे आता मागील चार वर्षांचे वर्चस्व एका झटक्यात संपुष्टात आले आहे. त्याचप्रमाणे, ईशान किशनही टी-२० फलंदाजी क्रमवारीत अव्वल स्थानावरून तिसऱ्या स्थानावर घसरला आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात ११३ धावांची विक्रमी खेळी करणारा भारताचा अभिषेक शर्मा अव्वल खेळाडू ठरला आहे.गेल्या चार वर्षांपासून अव्वल कसोटी अष्टपैलू खेळाडू असलेला रवींद्र जडेजा ताज्या क्रमवारीत ४२२ रेटिंग गुणांसह दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. दक्षिण आफ्रिकेच्या सायमन हार्मनने २२८ रेटिंग गुणांसह १५ स्थानांनी झेप घेत अव्वल २० खेळाडूंमध्ये आठवे



स्थान पटकावले आहे.दक्षिण आफ्रिकेचा मार्को यान्सन ४५१ च्या रेटिंगसह आयसीसी कसोटी अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत अव्वल स्थानी पोहोचला आहे. हे त्याच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम रेटिंग आहे. पहिल्या पाचमध्ये कोणताही बदल झालेला नाही. घाटाबाद येथे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी सामन्यात जानसेनने एकूण सहा बळी घेतले आणि ८५ धावा केल्या.बांगलादेशचा मेहदी हसन मिराज आयसीसी कसोटी अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर कायम आहे. वेन मल्डर चौथ्या क्रमांकावर, तर मिचेल स्टार्क पाचव्या क्रमांकावर आहे. रवींद्र जडेजानंतर वॉशिंग्टन सुंदर हा अव्वल १० मध्ये स्थान मिळवणारा दुसरा भारतीय खेळाडू आहे. सुंदर २३४ च्या रेटिंगसह सातव्या क्रमांकावर आहे.

जर्सी नंबर ३३ ने वाढवलं गूढ, अश्विनच्या कमेंटने चर्चेला नवं वळण!

■ मुंबई/वृत्तसंस्था

आयपीएल 2027 च्या आधी हार्दिक पांड्या चेन्नई संघात सामील होणार असल्याच्या चर्चांना जोर चढला आहे. गेल्या हंगामात हार्दिक पांड्याचे मुंबई संघ व्यवस्थापनासोबतचे संबंध बिघडले होते, असे समोर आले होते. त्यानंतर तो इतर संघांमध्ये सामील होणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. पण चेन्नई सुपर किंग्सच्या एका पोस्टने या चर्चांना आणखी खतपाणी घातले आहे. अश्विनच्या प्रतिक्रियेमुळे या चर्चा खऱ्या ठरण्याची शक्यता वाढली आहे.पाच वेळा चॅम्पियन ठरलेल्या चेन्नई सुपर किंग्सच्या एका सोशल मीडिया पोस्टने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्या आगामी हंगामात चेन्नईच्या पिवळ्या जर्सीमध्ये दिसू शकतो, अशी जोरदार चर्चा सुरू आहे. या चर्चेमागे तीन घटक आहेत. पहिला चेन्नईच्या एका प्रमोशनल व्हिडिओमध्ये 33 हा आकडा दिसणे. दुसरा माजी भारतीय क्रिकेटपटू रविचंद्रन अश्विनची गूढ प्रतिक्रिया. तिसरा चेन्नई फ्रँचायझीने रात्री 10:33 वाजता केलेली पोस्ट.ज्यामध्ये फ्रँचायझीने चाहत्यांना इशारा दिला आहे की, ते गोष्टींचा जास्तच अर्थ लावत आहेत. 27 ऑक्टोबर रोजी चेन्नई सुपर किंग्सने आयपीएल 2027 साठी आपल्या कोचिंग स्टाफचा एक व्हिडिओ शेअर केला. यामध्ये संघाचे नवीन मुख्य प्रशिक्षक, झहीर खान, आणि फ्रँचायझीचा शुभंकर, लिओ, हे दिसत होते. व्हिडिओमध्ये लिओने झहीर खानला संघाच्या तयारीबद्दल आणि खेळाडूंच्या अदलाबदलीबद्दल प्रश्न विचारले. झहीर खानने



अदलाबदलीबद्दल कोणतीही विशिष्ट माहिती दिली नाही. मात्र, 33 हा आकडा लिहिलेला एक कागदाचा तुकडा दिसला.त्यानंतर चाहत्यांनी हा आकडा हार्दिक पांड्याशी जोडायला सुरुवात केली. हार्दिक भारतीय संघ आणि मुंबई इंडियन्ससाठी 33 क्रमांकाची जर्सी घालतो. काही चाहत्यांनी याला चेन्नईसाठी एक संकेत मानले. चेन्नईच्या 'एक्स' हँडलवरून रात्री 10:33 वाजता आणखी एक पोस्ट करण्यात आली. तमिळमध्ये लिहिलेल्या या पोस्टमध्ये म्हटले होते की, चाहते प्रत्येक गोष्टीचा अवास्तव अर्थ लावत आहेत. मात्र, चाहत्यांनी पोस्टच्या वेळेकडे लक्ष वेधले.

ही पोस्ट रात्री 10:33 वाजता टाकण्यात आल्यामुळे लोकांनी तिचा संबंध हार्दिकच्या जर्सी क्रमांक 33 शी जोडला. यामुळे असा प्रश्न निर्माण झाला आहे की, चेन्नई जाणूनबुजून असे सूचक अर्थ काढत आहे की चाहते केवळ सामान्य घटनांना या ट्रेडशी जोडून पाहत आहेत. भारताचा माजी फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विनच्या प्रतिक्रियेमुळे हार्दिकच्या ट्रेडच्या चर्चांनाही बळ मिळत आहे.

चेन्नईतील व्हिडिओवरून सुरू असलेल्या अटकळींवर प्रतिक्रिया देताना त्याने लिहिले, "ऑन, प्रॉपर कुकिंग." जेव्हा काहीतरी रंजक घडत असते किंवा मोठी बातमी अपेक्षित असते, तेव्हा सोशल मीडियावर अनेकदा हा शब्दप्रयोग वापरला जातो. अनेक चाहत्यांनी अश्विनच्या प्रतिक्रियेचा संबंध हार्दिकच्या ट्रेडशी जोडला आहे. चेन्नई सुपर किंग्सचे सीईओ कासी विश्वनाथन यांनी हार्दिकच्या ट्रेडबद्दलच्या अटकळी फेटाळून लावल्या आहेत.

मी थायलंडला गेले अन् त्यानं.. मराठी अभिनेत्रीची फसवणूक, सांगितला धक्कादायक प्रकार



आजकाल सामान्यांपासून ते कलाकारांपर्यंत सर्वांसोबत फसवणुकीचे प्रकार पाहायला मिळतात. याबद्दल कलाकार सोशल मीडियावर जागरूकता निर्माण करण्यासाठी त्यांचे अनुभवही शेअर करतात. अशातच आता मराठी अभिनेत्री हेमल इंगळेसोबत एका धक्कादायक प्रकार घडला आहे. त्याबद्दल तिनं सोशल मीडियावर माहिती देत घडलेला प्रकार सांगितला आहे.हेमल इंगळे म्हणाली की, 'माझ्यासोबत कदाचित एक स्कॅम झाला आहे. एक ऑक्टोबर रोजी मी जोगेश्वरी फर्निचर मार्केटमधून एक बेड खरेदी केला. त्याचे ऍडव्हान्स पैसे मी दिले होते. त्यानंतर मी थायलंडला गेले. त्यानं पितृपक्ष संपल्यावर साधारण दहा तारखेपर्यंत बेड डिलिव्हर करायचा असं ठरलेलं. मी माझ्या आईला त्या संदर्भातले सगळे रिसीट वगैरे देऊन गेलेले. मी आल्यावर सुद्धा तो बेड आला नव्हता, त्यामुळे मी त्या माणसाला फोन केला. तो फोनवर मी दोन दिवसांनी देतो, तीन दिवसांनी देतो, असं पुढे ढकलत राहिला आणि एक आठवडा काढला. मग मी कंटाळून त्याला फोन केला आणि म्हटलं की काय चालू आहे तुझं? तर तो मला म्हणाला की मैडम माझं गोडाऊन जळालं.'

'मी त्याच्यावर विश्वास ठेवला. कदाचित तो खोटं बोलत नसावा असं वाटलं. मी त्याला पुन्हा विचारलं की, माझा बेड कधी देणार ? यावर तो दोन दिवसांनी देणार असं म्हणाला. तीन दिवसांनी मी फोन केला तेव्हा त्याने माझा फोन उचललाच नाही. त्याने माझा फोन कट केला आणि मेसेज पाठवला की, मी हॉस्पिटलमध्ये आहे, त्यामुळे तुमचा फोन आता उचलू शकत नाही. एक तर त्याचा दिवसभर फोन स्विच ऑफ असतो. संध्याकाळी मला त्याचा फोन ऑन झाला चा मेसेज आला म्हणून मी त्याला फोन केला. फोन केल्यावर तो मला काही ना काही तरी कारण देत होता. असे परत करत आता त्याने 28 दिवस काढले आहेत. अजूनही माझा बेड आलेला नाही.'आता जो माझ्याकडे बेड आहे तो माझ्या ओनरचा बेड आहे. मी एका मैत्रेस बेडसोबत कोलॅबोरेट केलं होतं. त्यामुळे ती मैत्रेस सुद्धा माझ्याकडे येऊन पडली आहे. पण, बेडच नाही तर आता मी काय करायला हवं? शिवाय मध्ये जेव्हा मी पंधरा-वीस दिवसांपूर्वी त्याला फोन केलेला तेव्हा तो मला म्हणाला, माझं गोडाऊन जळालं, त्यात माझा खूप नुकसान झालं. तुम्ही मला माझे उरलेले पैसेसुद्धा पूर्ण द्या मग मी तुम्हाला तुमचा बेड नीट पूर्ण करून देतो. तर मी ते सुद्धा त्याला पैसे पूर्ण देऊन टाकले. मी नॉर्मली कधीच असा मूर्खपणा करत नाही. पण यावेळी मी ते केलं, मी त्याला पोलिसांची ही धमकी दिली. मी त्याला पोलिसांकडून सुद्धा फोन लावला पण त्यांना सुद्धा तो त्याच थापा देतो. मी हॉस्पिटलमध्ये आहे वगैरे सांगतो, माझा सगळं सामान जळालं आहे. मला आता कळत नाहीये की या माणसासोबत मी काय करावं?' असं अभिनेत्री शेवटी म्हणाली.

'मी घरच्यांकडे सतत आग्रह धरला अन् अखेर'



मराठी मनोरंजनविश्वातील लोकप्रिय अभिनेत्री प्राजक्ता माळी सोशल मीडियावर नेहमीच सक्रिय असते. आपल्या अभिनयाने आणि सौंदर्याने प्रेक्षकांची मनं जिंकणारी प्राजक्ता तिच्या वैयक्तिक आयुष्यातील खास क्षणही चाहत्यांसोबत शेअर करत असते. सध्या अभिनेत्री राजस्थानच्या सहलीमुळे चर्चेत आली आहे.प्राजक्ताने राजस्थानमधील काही खास फोटो सोशल मीडियावर शेअर केले असून, त्यासोबत लिहिलेल्या कॅप्शनने चाहत्यांचं लक्ष वेधलं आहे. राजस्थानला भेट देण्याची इच्छा अनेक दिवसांपासून होती आणि अखेर ती पूर्ण झाली, असं तिने या पोस्टमधून सांगितलं आहे. प्राजक्ता माळीने आपल्या पोस्टमध्ये राजस्थानला भेट देण्याची इच्छा किती जुनी होती, हे सांगितलं आहे. राजस्थानला जायचं, अशी इच्छा तिने घरच्यांकडे वारंवार व्यक्त केली होती. या सहलीसाठी ती सतत आग्रह करत होती. अखेर तिची ही इच्छा पूर्ण झाली आणि तिला राजस्थानला जाण्याची संधी मिळाली. आपली एखादी इच्छा मनापासून व्यक्त केली आणि ती प्रत्यक्षात आली, की होणारा आनंद वेगळाच असतो. प्राजक्ताच्या बाबतीतही असंच काहीसं घडलं आहे. राजस्थानमध्ये घालवलेला दिवस तिच्यासाठी खास ठरला.

महाराष्ट्राच्या ाजी मुख्यमंत्र्यांच्या नातवाशी जान्हवी कपूर कधी करणार लग्न ? 'कॉफी विथ करण' मध्ये सांगितली



बॉलीवूड अभिनेत्री जान्हवी कपूर आणि शिखर पहारिया हे दोघेही गेल्या अनेक वर्षांपासून रिलेशनमध्ये आहेत. दोघं अनेकदा एकत्र दिसले आहेत, मात्र त्यांनी आत्तापर्यंत आपल्या नात्याबद्दल खुलेपणे भाष्य केलं नव्हतं. मात्र नुकतीच 'कॉफी विथ करण'मध्ये आलेल्या जान्हवी शिखरसोबतच्या नात्याबद्दल मोकळेपणे बोलली. एवढंच नव्हे तर ती शिखरशी लग्न कधी करणार हेही तिने स्पष्टपणे सांगितलं.कॉफी विथ करण'च्या लेटेस्ट एपिसोडमध्ये जान्हवी कपूर ही अभिनेता वरुण धवन आणि तिचा भाऊ, अभिनेता अर्जुन कपूर याच्यासोबत आली होती. त्यावेळी करण जोहरने जान्हवीला विचारलं की तू शिखरला ऑफिशिल डेट करत आहेस का ? त्यावर जान्हवीने 'हो' असं उत्तर दिलं. एवढंच नव्हे तर याच एपिसोडमध्ये जान्हवीला तिच्या लग्नाबद्दलही प्रश्न विचारण्यात आला, त्यावरही जान्हवीने अगदी स्पष्टपणे उत्तर दिलं.आमच्या नात्याला (कोणाची) नजर लागावी असं मला वाटतं नाही. मी माझ्या खासगी आयुष्याबद्दल गरजेपेक्षा जास्त बोलू इच्छित नाही. पण कोणालाही , काहीच कळलं नाही पाहिजे, असं सतत म्हणणं देखील योग्य नाही, ते जरा जास्तच होतं. प्रत्येक गोष्ट लपवून ठेवणं आणि नात्याबद्दल अगदी जपून-जपून बोलणं बोरिंग होतं. ही काही एवढी मोठी गोष्ट नाहीये", असं जान्हवी म्हणाली.

या दरम्यान वरुण धवनने देखील शिखरबद्दल जान्हवीच्या पसंतीचा उल्लेख केला. त्याने विमान प्रवासातील एक किस्सा सांगितला. प्रवासादरम्यान परिस्थिती थोडी कठीण झाली होती आणि त्यावेळी मी त्या दोघांनाही सांभाळत होतो, असं वरुणने गंमतीने म्हटलं.यानंतर करण जोहरने जान्हवीला लग्नाबाबत प्रश्न विचारला. त्यावर अभिनेत्रीने स्पष्टच उत्तर दिलं – आणखी 2-3 वर्ष तरी बिलकुल नाही. सध्या ती आणि शिखर त्यांच्या नात्यात आनंदी आहेत. त्यांच्या आजूबाजूला अनेकांचे नातेसंबंध तुटत असले, तरी दोघांचं नातं सध्या चांगल्या टप्प्यावर आहे, असंही जान्हवीने पुढे सांगितलं

ती माझ्या आयुष्यातली पहिली आणि शेवटची चूक, श्वेता तिवारीबद्दल प्रसिद्ध अभिनेत्यानं केलेलं वक्तव्य



छोट्या पडद्यावरील अनेक मालिका प्रेक्षकांच्या मनात कायमचं घर करतात. काही मालिकांमधील कलाकारांच्या भूमिका इतक्या लोकप्रिय होतात की, वर्षानुवर्षे त्यांची ओळख त्या भूमिकेशी जोडलेली राहते. अशीच लोकप्रियता अभिनेता सीझेन खान याला 'कसौटी जिंदगी की' या मालिकेमुळे मिळाली. या मालिकेत अनुराग बासूची भूमिका साकारून तो घराघरात पोहोचला. मात्र, त्याच्या अभिनयासोबतच अभिनेत्री श्वेता तिवारीसोबतच्या अफेअरमुळेही तो चर्चेत आला होता.

कसौटी जिंदगी की' या मालिकेत सीझेन खान आणि श्वेता तिवारी यांनी अनुराग बासू आणि प्रेरणा शर्मा या भूमिका साकारल्या होत्या. पडद्यावर या जोडीला प्रेक्षकांकडून भरभरून प्रेम मिळालं. त्याच काळात दोघांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दलही अनेक चर्चा रंगल्या होत्या. सीझेन आणि श्वेता एकमेकांच्या प्रेमात असल्याच्या बातम्या त्या काळात समोर आल्या



होत्या. सुरुवातीला दोघांनीही आपल्या नात्याबद्दल उघडपणे बोलणं टाळलं. मात्र, नंतर सीझेननं एका मुलाखतीत श्वेतासोबतच्या नात्याची कबुली दिली. त्यानं या नात्याचा उल्लेख करताना श्वेता ही आपल्या आयुष्यातील 'पहिली आणि शेवटची चूक' असल्याचंम्हटलं होतं. त्याच्या या विधानामुळे मनोरंजनविश्वात मोठी चर्चा झाली होती.

२००५ मध्ये 'इंडिया फोरम्स'ला दिलेल्या मुलाखतीत श्वेता तिवारीसोबतच्या नात्याबद्दल बोलताना सीझेन म्हणालेला की, 'तो माझा भूतकाळ आहे आणि मी आता माझ्या आयुष्यात पुढे गेलोय. श्वेता ही माझी पहिली आणि शेवटची चूक होती. आता माझा तिच्याशी काहीही संबंध नाही. ती माझ्यासाठी कोणीच नाही आणि मी तिच्यासारख्या कोणत्याही स्त्रीकडे पुन्हा कधीही पाहणार नाही.'वैयक्तिक वादांनंतर आणि सुरुवातीच्या यशानंतर, सीझेन खाननं इंडस्ट्रीपासून दूर राहण्याचा निर्णय घेतला. २० वर्षांपासून प्रसिद्धीपासून दूर राहिल्यानंतर, तो २०२१ मध्ये 'शक्ती – अस्तित्व के एहसास की' या मालिकेतून त्यानं छोट्या पडद्यावर पुन्हा पदार्पण केलं. २०२२ मध्ये, तो सोनी टीव्हीच्या 'अपनापन – बदलते रिश्तों का बंधन' या मालिकेत दिसला. मात्र, अवघ्या पाच महिन्यांनंतर, नोव्हेंबर २०२२ मध्ये 'अपनापन' ही मालिका बंद झाली. सध्या अभिनेता सोशल मीडियावर सक्रिय असून तो व्हिडिओ आणि फोटो शेअर करतो.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

जी. एस. महाविद्यालयात अत्याधुनिक एन-जेनपोस्ट ऑफिसचे उद्घाटन

विद्यार्थ्यांसाठी टपाल सेवांसह वाचनालय, वाय-फाय, इनडोअर खेळांच्या सुविधाही उपलब्ध....

जनसंचलन/बुलढाणा


भारतीय डाक विभागाच्या आधुनिकीकरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत जी. एस. महाविद्यालय, खामगाव येथे अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज ङ्गएन-जेनफ (-) पोस्ट ऑफिसचे उद्घाटन ५ नोव्हेंबर रोजी उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुभाष शंकररावजी बोबडे यांच्या हस्ते या पोस्ट ऑफिसचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. सुधीर जी. जाखेरे, संचालक डाक सेवा, नागपूर क्षेत्र, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम साकारण्यात आला. यावेळी जी. एस. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय तुकाराम वराडे, एनसीसीचे सुभेदार मेजर अनिलकुमार मिश्रा यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच सहायक संचालक डाक सेवा जयंत दावू आणि बुलढाणा विभागाचे अधीक्षक डाकघर गजेंद्र नारायणराव जाधव यांची विशेष उपस्थिती होती. नव्या पिढीच्या गरजा आणि बदलत्या तंत्रज्ञानाचा विचार करून विकसित करण्यात आलेले हे पोस्ट ऑफिस केवळ टपाल सेवा केंद्र न राहता विद्यार्थ्यांसाठी ज्ञान, तंत्रज्ञान आणि मनोरंजनाचे आकर्षक केंद्र ठरणार आहे. या कार्यालयात वातानुकूलित सुविधा, मोफत वाय-फाय, वाचनालय, कॅरम, बुद्धिबळ व लुडो यांसारखे इनडोअर खेळ तसेच गिटारसारख्या मनोरंजनात्मक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. याशिवाय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांसाठी कॉपी व्हेंडिंग मशीनची सुविधाही देण्यात आली आहे. या एन-जेन पोस्ट ऑफिसमधून विद्यार्थ्यांसह प्राध्यापक आणि नागरिकांना डाक जीवन विमा, ग्रामीण डाक जीवन विमा, डाकघर बचत खाते, स्पीड पोस्ट, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पार्सल बुकिंग, ई-पोस्ट बुकिंग तसेच डिजिटल व्यवहार अशा विविध सेवा एकाच छताखाली उपलब्ध होणार आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून टपाल सेवांचा विस्तार करण्यासोबतच तरुण पिढीला भारतीय डाक विभागाशी जोडण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. पारंपरिक टपाल सेवांना आधुनिक सुविधांची जोड देणारे जी. एस. महाविद्यालयातील हे एन-जेन पोस्ट ऑफिस बुलढाणा डाक विभागासह महाविद्यालयासाठीही अभिमानाची बाब ठरले आहे.

क्रीडा व युवक संचालनालयाच्या राज्यस्तरीय शालेय स्पर्धां पालघर येथे संपन्न..

राज्यस्तरीय स्पर्धेत बुलढाण्याच्या सिद्धांतला सिल्वर मेडल.

जनसंचलन/बुलढाणा

क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य,पुणे अंतर्गत मुंबई येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय शालेय स्पर्धांमध्ये सतरा वर्षाखालील दोनशे मीटर रनिंग मध्ये बुलढाण्याच्या सिद्धांत रोठेंनी दुसरा क्रमांक पटकावत सिल्वर मेडल वर शिक्का मोर्तब केले आहे. त्यामुळे सिद्धांतची राष्ट्रीय स्पर्धेसाठी सलग दुसऱ्यांदा निवड झाली आहे. क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत महाराष्ट्रातील राज्यस्तरीय शालेय स्पर्धा मुंबई, पालघर येथे आज ०६ नोव्हेंबरला संपन्न झाल्या आहेत. महाराष्ट्रातील तालुका, जिल्हा आणि विभागीय विजय स्पर्धकांमधून प्रथम, द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविता येतो. तर राज्यस्तरीय स्पर्धेमधून राष्ट्रीय स्पर्धे करिता विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. त्यामध्ये अमरावती आणि नागपूर डिव्हिजन मधून सिद्धांत २०० मीटर रनिंग स्पर्धेत सहभाग घेत सिल्वर मेडल पटकाविले आहे. तर यापूर्वी ही सिद्धांत ने महाराष्ट्र ज्युनिअर अटलांटिक्स चॅम्पियनशिप मध्ये राज्यस्तरीय ६० मीटर रनिंग स्पर्धेमध्ये गोल्ड मेडल घेत चेन्नई येथील राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविलेला आहे.तर नुकत्याच मुंबई पालघर येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक घेत राष्ट्रीय नामांकनासाठी मातृतीर्थ बुलढाणा जिल्ह्यातील सिद्धांतची निवड झाली आहे. आपल्या यशाचे सिद्धांतने महाराष्ट्र शासनाची लक्ष्यवेध अँकॅडमी नागपूर आणि प्रशिक्षक शमशेर खान, बुलढाण्याचे प्रशिक्षक इंगळे सर, गोपाल दादा राजपूत यांच्यासह आई-वडिलांना दिले आहे. विविध स्तरातून सिद्धांतवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



बुलढाणा जिल्ह्यात कुष्ठरोग शोधमोहीम ; १६ हजारांहून अधिक नागरिकांची तपासणी

जनसंचलन-बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्यात १४ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत कुष्ठरोग विभागामार्फत व सहवासित सर्वेक्षण मोहीम राबविण्यात आली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजित मंडाले आणि सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ. हरी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेसाठी प्रशिक्षित पथके तयार करण्यात आली होती. पुरुषांची तपासणी करण्यासाठी आरोग्य सेवक, तर महिलांची तपासणी करण्यासाठी आरोग्य सेविका व आशा सेविकांची नियुक्ती करण्यात आली होती. आरोग्य सेवक, आरोग्य सेविका व आशा सेविकांच्या माध्यमातून अंतर्गत एकूण ५ लाख ५६ हजार ४१ नागरिकांची, तर सहवासित सर्वेक्षण मोहिमेत २७ हजार २४३ नागरिकांची तपासणी करण्यात आली. तपासणीत १ हजार ९९३ संशयित रुग्ण आढळून आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर १९ नवीन कुष्ठरुग्णांचे निदान करून त्यांच्यावर त्वरित उपचार सुरू करण्यात आले. तसेच सहवासित सर्वेक्षणात ६०३ संशयित रुग्ण आढळले. त्यापैकी तपासणीनंतर ५ नवीन कुष्ठरुग्णांचे निदान करण्यात आले असून त्यांच्यावरही औषधोपचार सुरू करण्यात आले आहेत. या मोहिमेअंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र चांडोळ अंतर्गत वरुड येथील पेनांग साखर कारखाना प्रायव्हेट लिमिटेड, माईनगर येथील कर्मचारी व कामगारांची तसेच ऊस वाहतूक करणारे ट्रक व ट्रॅक्टर चालक आणि कारखाना परिसरातील कामगारांच्या कुटुंबीयांचीही कुष्ठरोग तपासणी करण्यात आली. साखर कारखान्याशी निगडित एकूण १०५ जणांची तपासणी करण्यात आली. या मोहिमेत सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका आणि आशा सेविकांनी सहभाग घेतला. कुष्ठरोगाचे लवकर निदान झाल्यास प्रभावी उपचार शक्य असल्याने नागरिकांनी शरीरावर संशयास्पद डाग किंवा लक्षणे आढळल्यास त्वरित जवळच्या शासकीय आरोग्य केंद्रात तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे

राज्यातील भरती परीक्षा सुधारणांसाठी गठित उच्चस्तरीय समितीचा अंतरिम अहवाल शासनास सादर

जनसंचलन/मुंबई

राज्यातील भरती परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित व विश्वासार्ह करण्याच्या उद्देशाने शासन निर्णय दिनांक ४ सप्टेंबर २०२६ अन्वये उच्चस्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. या समितीने राज्यातील विविध विभागांमधील विद्यार्थी व संबंधित हितधारकांशी केलेल्या सल्ला मसलतीदरम्यान प्राप्त मागण्या, सूचना व अभिप्रायांचा अभ्यास केला आहे. विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या काही महत्त्वाच्या व तातडीच्या मुद्यांवर प्राधान्याने निर्णय घेणे आवश्यक असल्याने समितीने अंतरिम अहवाल उच्चस्तरीय समितीच्या प्रमुख शिफारशी परीक्षेतील पदसंख्येत वाढ : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ या परीक्षेसाठी सुमारे १२ लाख उमेदवारांनी अर्ज केले असून सध्यास्थितीत ५ हजाराहून अधिक पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. विविध विभागांकडून आणखी ११ हजाराहून अधिक पदांची मागणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठविण्यात आली आहे. ही अतिरिक्त पदे शुद्धिपत्रकाद्वारे समाविष्ट करून एकूण पदसंख्या १६ हजारापेक्षा अधिक करण्याची शिफारस करण्यात आली आहे. उमेदवारांच्या मागण्यांचा विचार करून कमाल वयोमर्यादेत एक वेळची विशेष बाब म्हणून एक वर्षाची सवलत देण्याची शिफारस करण्यात आली आहे. ही सवलत दिनांक १ जानेवारी २०२६ नंतर प्रसिद्ध झालेल्या व निवड प्रक्रिया सुरू न झालेल्या सर्व जाहिराती, तसेच दिनांक ३१ डिसेंबर २०२७ पर्यंत प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींसाठी लागू राहील. तसेच, गट-क परीक्षा २०२६ परीक्षेसाठी अतिरिक्त पदांकरीता व वयोमर्यादा सवलतीमुळे पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना संधी मिळावी यासाठी अर्ज प्रक्रिया एकदा पुन्हा सुरू करण्याची शिफारस करण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणाऱ्या परीक्षा प्रक्रियेबाबत इतर महत्त्वाच्या शिफारशी गट-क पूर्व परीक्षेच्या विद्यमान परीक्षा पद्धतीत व अभ्यासक्रमात कोणताही बदल न करणे, नव्याने समाविष्ट होणाऱ्या संवर्गांचे मुख्य परीक्षेचे अभ्यासक्रम लवकरच जाहीर करणे, खबरदारीचा उपाय म्हणून यापूर्वीची प्रश्नपत्रिका निर्मितीची कार्यवाही रद्द करून सुरक्षित प्रक्रियेद्वारे नव्याने प्रश्नपत्रिका तयार करणे, प्रश्नपत्रिका व ओएमआर उत्तरपत्रिकांची छपाई, साठवणूक व वाहतूक यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवणे, तसेच परीक्षा केंद्रांवर पोलीस बंदोबस्त, सीसीटीव्ही देखरेख, सिग्नल जॅमर आणि प्रशिक्षित मनुष्यबळाची व्यवस्था करणे आदी शिफारशी समितीने केल्या आहेत.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

पत्र्यांना गर्दी, फटाक्यांकडे पाठ! मलकापूर पांग्राच्या दिवाळी बाजारात दुष्काळाची झळ

आठवडी बाजार गजबजला, पण खरेदी मोजकीच; फटाके विक्रेते ग्राहकांच्या प्रतीक्षेत!

जनसंचलन/ सिंदखेडराजा

मलकापूर पांग्राच्या गुरुवारच्या आठवडी बाजारात दिवाळी खरेदीसाठी तुफान गर्दी उसळली. एका बाजूला पणत्या, रांगोळी आणि पूजेच्या साहित्याच्या दुकानांवर ग्राहकांची लगबग होती, तर दुसरीकडे फटाक्यांच्या दुकानांत शुकशुकाट होता. रविवार, ८ नोव्हेंबरच्या लक्ष्मीपूजनासाठी बाजार सजला, पण दुष्काळाची झळ खरेदीतही दिसली. सकाळपासूनच महिला आणि कुटुंबांची बाजारात वर्दळ होती. लक्ष्मीमूर्ती, तेल, वाती, कापूर, उदबत्ती आणि फराळाच्या साहित्याला ग्राहकांनी प्राधान्य दिले. आकाशकंदील, तोरणे, सजावटीच्या माळा आणि नव्या कपड्यांनी बाजाराला सणाचा रंग चढवला. मात्र, गर्दीच्या तुलनेत खरेदी मोजकीच होती. घरच्या पूजेसाठी आणि फराळासाठी लागणारे सामान घेण्यावर अनेकांचा भर होता. पावसाने दडी मारल्याने खरीप पिकांना मोठा फटका बसला. हंगामातून अपेक्षित उत्पन्न हातात न आल्याने शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांच्या दिवाळीच्या बजेटलाही कात्री लागली. त्याचा परिणाम बाजारात जाणवला. सणाची तयारी सुरू असली तरी खरेदी करताना अनेक कुटुंबांनी हात आखडता घेतला. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा फटाक्यांच्या दुकानांकडे ग्राहकांची पावले कमी वळली. विक्रेत्यांनी दुकाने सजवून विविध फटाके मांडले होते, तरी अपेक्षित गर्दी झाली नाही. वाढता खर्च आणि दुष्काळामुळे अनेक कुटुंबांनी फटाक्यांवरील खर्चाला कात्री लावल्याचे चित्र होते. बाजाराच्या एका टोकाला पूजेच्या साहित्याची खरेदी जोरात सुरू होती, तर फटाक्यांच्या दुकानांवर व्यापाऱ्यांची प्रतीक्षा कायम होती.



बुलढाणा लोकसभा मतदारसंघात शिवसेना सोशल मीडियाला मिळाले नवे शिलेदार!

किरण देशपांडे यांची बुलढाणा लोकसभा प्रमुखपदी नियुक्ती!

जनसंचलन-डोणगाव

वंदनीय हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने, शिवसेना मुख्य नेते मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब (उप-मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या आदेशानुसार, खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना सोशल मीडिया बुलढाणा लोकसभा प्रमुख या पदावर श्री. किरण देशपांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दि. ०६ नोव्हेंबर २०२६ रोजी हे नियुक्ती पत्र निर्गमित करण्यात आले असून, सदर नियुक्तीचा कालावधी एक वर्षाचा असेल. आजचा काळ हा सोशल मीडियाचा काळ आहे. घराघरात, तरुणांच्या मोबाईलमध्ये शिवसेनेचा विचार पोहोचवणे हीच खरी आजची गरज आहे. ही जबाबदारी आता किरण देशपांडे यांच्या खांद्यावर देण्यात आली आहे. वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची शिकवण, याचा आपण सक्रीयपणे प्रसार आणि प्रचार कराल, तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्वांना सोबत घेऊन कार्य कराल, असा विश्वास नियुक्ती पत्रात व्यक्त करण्यात आला आहे. ही नियुक्ती शिवसेना सोशल मीडिया उप राज्य प्रमुख प्रतिक संध्या सुनिल शर्मा आणि शिवसेना सोशल मीडिया पश्चिम विदर्भ विभागीय प्रमुख सचिन रमाबाई गोपाल व्यास यांच्या स्वाक्षरीने जाहीर करण्यात आली आहे. बुलढाण्यात शिवसैनिकां मध्ये उत्साह..



या नियुक्तीमुळे बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून शासनाच्या योजना, शिवसेनेची भूमिका, हिंदुत्वाचा विचार आणि सामान्य जनतेचे प्रश्न आता अधिक जोमाने मांडले जाणार आहेत. किरण देशपांडे यांच्या नियुक्तीबद्दल बुलढाणा जिल्ह्यातील शिवसेनेच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शिवसैनिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

परड्याच्या सुपुत्राची भरारी!

जनसंचलन-मोताळा

कोणतीही मोठी पार्श्वभूमी नसताना, केवळ उच्च ध्येय, खडतर मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर जिद्द बाळगल्यास यश निश्चित मिळते, हे परडा (ता. मोताळा) येथील सुपुत्र प्रेम गोपाल शिंबरे यांनी सिद्ध करून दाखवले आहे. आपल्या अहोरात्र अभ्यासानंतर आणि उत्कृष्ट कौशल्याच्या बळावर प्रेम शिंबरे यांची देशातील व जगातील अत्यंत नामांकित अशा ङ्कफ ( ) या बहुराष्ट्रीय कंपनीत निवड झाली आहे. त्यांच्या या घवघवीत यशाने संपूर्ण परडा गावासह बुलढाणा जिल्ह्यात आनंदाचे वातावरण पसरले आहे. सामान्य कुटुंबातून आलेल्या प्रेम शिंबरे यांनी आपल्या शिक्षणादरम्यान कधीही संकटांना हरू दिले नाही. तांत्रिक शिक्षण घेत असताना त्यांनी आपल्या ध्येयावरून कधीच लक्ष विचलित होऊ दिले नाही. सातत्यपूर्ण मेहनत, प्रखर चिकाटी आणि तांत्रिक विषयांवर असलेली उत्तम पकड यांच्या जोरावर त्यांनी सारख्या अग्रगण्य कंपनीच्या कठीण निवड प्रक्रिया टप्प्यांना यशस्वीरीत्या पार केले. त्यांच्या या यशामागील त्यांची निष्ठा आणि कुटुंबाचे मोलाचे प्रोत्साहन प्रेरणादायी ठरले आहे.



वर्गात विद्यार्थी घडवले आता शाळेची धुरा जाधव सरांकडे!

मुख्याध्यापकपदी पदोन्नती होताच सचिव कोरडे पाटील यांच्या हस्ते गौरव....

जनसंचलन/ रायपूर

रायपूरच्या श्री शिवाजी विद्यालयातील शिक्षक गजानन नारायण जाधव सर यांच्या मेहनतीवर पदोन्नतीची मोहोर उमटली आहे. वर्गात विद्यार्थ्यांना घडवणारे जाधव सर आता मुख्याध्यापक म्हणून संपूर्ण विद्यालयाचे नेतृत्व करणार आहेत. त्यांच्या पदोन्नतीची बातमी समजताच गावातील मान्यवर, शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला. पदोन्नतीनिमित्त आयोजित स्वागत समारंभात संस्थेचे सचिव कोरडे पाटील सर यांनी जाधव सरांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. शिक्षकाच्या मेहनतीची दखल घेत कोरडे पाटील यांनी स्वतः च्या हस्ते केलेला हा गौरव शालेय परिवारासाठीही कौतुकाचा क्षण ठरला. जाधव सरांच्या शैक्षणिक वाटचालीत या पदोन्नतीने नवे पर्व सुरू झाले असून, मुख्याध्यापकपदाच्या नव्या जबाबदारीसाठी त्यांना रायपूरमधून शुभेच्छा मिळत आहेत.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२८७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८